# बृहन्मुंबई महानगरपालिका
# सार्वजनिक आरोग्य खाते
# कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन
# जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन विभागाच्या आस्थापनेवरील **'कलाकार'** संवर्गाची पदे तात्पुरत्या स्वरुपात **'कंत्राटी' पध्दतीने** भरण्याकरीता अर्हताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**एकूण रिक्त जागा - 2**

`**कलाकार**` या सवंर्गाची विहित शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे.

1) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची उच्च माध्यमिक शालांत परिक्षा (बारावी) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असावा.
2) उमेदवार बॅचलर ऑफ फाईन आर्ट (कमर्शियल आर्ट) ही पदवी परिक्षा उत्तीर्ण असावा.
3) उमेदवार संगणकाचा डिप्लोमा इन डिजीटल ग्राफिक्स विथ फोटोशॉप अॅण्ड कोरल ड्रॉ हा कोर्स पूर्ण केलेला असावा व संगणकावर आर्टवर्क तयार करणे या कामाचा ३ ते ५ वर्षे अनुभव असावा.
4) उमेदवार शासनमान्यता प्राप्त संस्थेचा १ वर्षे कालावधीचा Computer Operator & Programming Assistant अभ्यासक्रम उत्तीर्ण असावा.
5) उमेदवार शासनमान्य संस्थेचा Desk Top Publishing (DTP) 6 महिन्याचा अभ्यासक्रम उत्तीर्ण असावा.
6) उमेदवार महाराष्ट्र शासनमान्य टंकलेखनाची मराठी ३० श. प्र. मि व इंग्रजी ४० श.प्र.मि परीक्षा उत्तीर्ण असावा.
7) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत १०० गुणांचा मराठी विषय (निम्नस्तर किंवा उच्चस्तर) घेऊन उत्तीर्ण असावा.
8) उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा `ओ` स्तर किंवा `ए` स्तर किंवा `बी` स्तर किंवा `सी` स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी.किंवा जीईसीटी चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे किंवा वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

(उपरोक्त अर्हतेमधील बॅचलर ऑफ फाईन आर्ट (कमर्शियल आर्ट) पदवीधारक उमेदवार प्राप्त न झाल्यास अनु क्र.३ ते ५ मधील अर्हता धारण करणा-या उमेदवारांचा विचार केला जाईल.)

९) `**कलाकार**` पदाची कर्तव्ये खालीलप्रमाणे-

| **कलाकार**`पदाची कर्तव्ये |
|---|
| I. आरोग्य विषयक जनजागृती साहित्याचे उदा. पोस्टर, बॅनर, होर्डिंग, हॅंडबिल, वृत्तपत्र जाहिरात, प्रदर्शन संच, प्ल-कार्ड इ. करिता संगणकावर आर्टवर्क तयार करणे. |
| II. उपरोक्त प्रकारच्या आर्टवर्कमध्ये वेगवेगळ्या प्रसंगी आवश्यकतेप्रमाणे आकार, भाषा (हिंदी, मराठी व इंग्रजी) व प्रारुपामध्ये बदल करणे. |
| III. वृत्तपत्र जाहिरातीच्या बाबतीत जनसंपर्क अधिकारी यांच्या विभागाशी समन्वयक साधणे. |
| IV. छापील साहित्य उदा. पोस्टर, हॅंडबील इ.करिता महापालिकेच्या मुद्रणालयाशी समन्वय साधणे. |
| V. मुद्रणालयातून छापून तयार झालेले साहितय कार्यालयाच्या ताब्यात घेऊन त्याचे आरोग्य खात्याच्या विविध विभागात /संस्थांत वितरण करणे. |
| VI. प्राप्त झालेले छापील साहित्य व त्याचे वितरण याबाबत सॅप प्रणालीत नोंदी ठेवणे<br>सार्वजनिक आरोग्य खात्याशी संबंधित विविध वर्तमानपत्रातील बातम्यांची कात्रणे दररोज संकलित करुन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अवलोकनासाठी सादर करणे. |
| VII कलाकार संवर्गाच्या कार्यकक्षेत मोडणारी, प्रसंगानुरुप उद्भवणारी इतर अनेक कामे<br>वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार पार पाडणे. |

**(ब) मानधन** - 'कलाकार' यांना रु ४००००/-(रु.चाळीस हजार फक्त) प्रति महिना एवढे निश्चित मानधन देण्यात येईल. त्यांना कोणत्याही प्रकारचे भत्ते दिले जाणार नाहीत.(सदर कंत्राटी पध्दतीचा कालावधी फक्त 6 महिन्याचा राहील.तदनंतर सेवा आपोआप संपुष्टात येईल)

**(क) वयोमर्यादा** - उमेदवाराचे वय दि. 01.01.2024 रोजी 18 वर्षापेक्षा कमी व 65 वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.

**(ड) निवडीचे निकषः-**

1) बॅचलर ऑफ फाईन आर्ट(कमर्शियल आर्ट) अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या गुणांच्या टक्केवारीनुसार उमेदवारांची निवड यादी तयार करण्यात येईल.

2) बृहन्मुंबई महानगरपालिकेत कलाकार या पदाशी संबंधित कामाचा अनुभव असणा-या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

3) सदर पदाच्या निवडीकरीता गठित करण्यात आलेल्या समितीद्वारे उमेदवारांची मुलाखत घेउन निवड केली जाईल.

तरी विहीत अर्हता धारण करणा-या इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील आपले अर्ज सांक्षांकीत केलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतीसह खालील ठिकाणी दिनांक.०८.०१.२०२४ पासून दि.१०.०१.२०२४पर्यंत सकाळी ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत सादर करावे व त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**<u>उमेदवारांनी अर्ज करावयाचे ठिकाण</u>**

उप कार्यकारी आरोग्य अधिकारी(कुकमाबासं)
सार्वजनिक आरोग्य खाते, एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
रुम नं १३, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
परळ, मुंबई- **400 012.**

**<u>(इ) कंत्राटी तत्वावर नियुक्त करावयाच्या कलाकार` या पदाकरीता अटी व शर्ती -</u>**

1. कंत्राटी तत्वावर नियुक्त होणारे 'कलाकार' हे तत्सम पदाकरीता विहीत केलेल्या अर्हता धारण करणारे असावे.

2. कंत्राटी तत्वावर नियुक्त होणा-या 'कलाकार' यांना महानगरपालिकेच्या नियमित सेवेसाठी हक्क सांगता येणार नाही.

3. कंत्राटी पध्दतीवरील 'कलाकार' यांची उच्चतम वयोमर्यादा 65 वर्षे राहील. (18 ते 65)

4. कराराच्या कालावधीत कंत्राटी पध्दतीवरील 'कलाकार' यांना करारनामा सादर करावा लागेल.

5. 'कलाकार' यांना प्रति माहे रु ४००००/-(रु.चाळीस हजार /-फक्त) प्रति महिना मानधन देण्यात येईल. त्यांना अन्य कोणत्याही प्रकारचे भत्ते दिले जाणार नाहीत.

6. तसेच सदर पदे विशिष्ट कालावधीसाठीच (Tenure post) असुन सदर पद कालावधी संपल्यानंतर संपुष्टात येईल.

7. नेमणुकीच्या विहित कालावधीत विवक्षित काम पुर्ण करण्याची जबाबदारी नियुक्त केलेल्या 'कलाकार' यांची राहील व तसे हमीपत्र त्यांचेकडून घेण्यात येईल.

8. कराराच्या कालावधीत संबंधित 'कलाकार' यांना कोणतेही प्रशासकीय अथवा आर्थिक संबंधात अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.

9. कराराच्या कालावधीमध्ये सदर 'कलाकार' यांना मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीमधील नियम लागू राहणार नाही. ही नेमणुक निव्वळ कंत्राटी पध्दतीवर असेल.

10 कंत्राट पध्दतीचे काम करणा-या 'कलाकार' काम कराराच्या कालावधीमध्ये जर असमाधानकारक असेल तर अशा 'कलाकार' ची कंत्राट पध्दतीवरील नियुक्ती, कोणतीही पुर्व सुचना न देता संपुष्टात आणण्यात येईल.

11. अर्ज विहित नमुन्यात सर्व दृष्टीने पूर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

12. अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्याच छायाचित्राच्या दोन अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी उमेदवाराजवळ ठेवणे आवश्यक आहे.

13. अर्जासाठी वापरण्यात येणारी कागद चांगल्या प्रतीचे (छायांकित प्रतीसाठी वापरण्यात येणा-या) लिगल (Legal) आकारातील असावे.

14. उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे कि ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास कंत्राटी उमेदवारी रद्द करण्यात येईल.

15. पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.

16. उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे, व्यावसायिक अर्हता, संबंधित गुणपत्रिका, अनुभवाचे प्रमाणपत्र, त्यांच्या मुळ प्रती व साक्षांकित झेरॉक्स प्रतीसह उपस्थित रहावे.

17. उमेदवारांना निवडीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

18. निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही विभागात नियुक्ती करण्यात येईल.

19. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षण उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/ कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची कंत्राटी नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

20. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 लागू होणार नाहीत.

**<u>विशेष सुचना:</u>**

1.सदर कंत्राटी पध्दतीचा कालावधी फक्त 6 महिन्याचा राहील.

2.कंत्राटी पध्दतीवर नेमणूक केलेल्या उमेदवारांची सेवा त्यांना पूर्वसुचना न देता संपुष्टात आणण्याचे अधिकार प्रशासनास राहतील.

3.कंत्राटी कालावधीत काम करणा-या उमेदवारांची सेवा तात्पूरत्या स्वरुपाची असल्याने त्यांची सदर सेवा सेवाजेष्ठतेसाठी विचारात घेतली जाणार नाही किंवा सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही.

4.निवड झालेल्या उमेदवारांनी संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सोबत जोडलेल्या करारनाम्याच्या नमुन्या प्रमाणे 200 रुपयाच्या बॉन्ड पेपरवर करारनामा द्यावा लागेल.

5.जर एखादया उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

6.मध्यस्थ/ठक/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांचा गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

7.प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्यावर थांबविण्याचे अधिकार मुंबई महापालिका आयुक्त यांना आहेत.

8.सेवायोजना कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांना देखील या जाहिरातीनुसार वैयक्तिक माहितीपत्रासह आणि आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या मूळ व सांक्षाकित प्रतींसह हजर राहणे आवश्यक आहे.

9.उमेदवाराने एकदा अर्ज केल्यानंतर विहित वेळ समाप्त झाल्यानंतर कोणतेही कागदपत्रे नंतर आणून दिल्यास ते कागदपत्रे ग्राहय धरले जाणार नाही व त्याचा अर्ज अपूर्ण समजून अपात्र ठरविण्यात येईल.

सही/-

(डॉ. दक्षा शाह)

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)

### पदाचे नाव:- 'कलाकार'(कंत्राटी)'

उमेदवारांने त्यांच्या
अलिकडे काढलेले पारपत्र
आकाराचे छायाचित्र लावून
फोटोवर स्वाक्षरी करावी
2.5 से.मी. x3 से.मी.

1.(अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम)(मराठीत) :---------------------------------------------------

(ब) वडिलांचे/पतीचे संपूर्ण नाव :---------------------------------------------------

(क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता):---------------------------------------------------

2.पत्ता व दुरध्वनी /मोबाईल क्र./ई-मेल आयडी:---------------------------------------------------

---------------------------------------------------

3.लिंग: पुरुष ः स्त्री:

4.अ) जन्मदिनांक: :- दिनाक महिना वर्ष

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

ब) दि.01.01.2024 रोजी असलेले वय---------------- वर्षे---------------- महिने

5.शैक्षणिक अर्हता:-

| **शैक्षणिक अर्हता** | **शालांत परिक्षा मंडळ / विद्यापीठाचे नाव** | **गुणांचा तपशील** | | **टक्केवारी** | **शालांत परिक्षेतील गुण** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | | मराठी | इंग्रजी |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

6.संगणकविषयक ज्ञान: MS-CIT किंवा शासनाने विहित केलेल्या संगणकविषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र : आहे/नाही

7.'कलाकार' पदाशी संबंधित कामकाजाचा अनुभव :

8.स्थानिक पोलिस ठाण्याचा संपूर्ण पत्ता : ------------------------------------------
------------------------------------------

आपला/आपली विश्वासू,

दिनांक:

ठिकाण:-

अर्जदाराची सही /-